पृ.क्र/अका/अकृषक/कावि/९३० /२०१२
अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय
दिनांक ०७/०६/२०१२

**प्रतिलीपी :-** **माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित**

१) उपविभागीय अधिकारी, यवतमाळ
२) तहसिलदार, यवतमाळ
३) सहाय्यक संचालक, नगर रचना, यवतमाळ
४) तलाठी, यवतमाळ मार्फत तहसिलदार, यवतमाळ
५) मुख्याधिकारी, नगर परिषद, यवतमाळ
६) उप अधिक्षक, भूमि अभिलेख, यवतमाळ
७) दुय्यम निबंधक, यवतमाळ
८) सचिव, स्थानिक प्राधिकरण, यवतमाळ ग्रामीण क्षेत्र, पंचायत समिती, यवतमाळ
९) आवेदक धारीवाल अँड छोरीया डेव्हलपर्स एल.एल.पी. तर्फे भागीदार शांतीलाल देविचंद जैन, रा.पुणे

अपर जिल्हाधिकारी यवतमाळ

**परिशिष्ट - १**

मौजा यवतमाळ ग्रामीण ता.यवतमाळ येथील गट नं. ३०/१, ३०/२, ३०/३, ३०/४/२ एकूण क्षेत्र ७.८९ हे.आर जमीन निवासी प्रयोजनाकरीता मंजूर केलेले भूखंडनिहाय वार्षिक अकृषक आकारणी दर रु. ०.१० पै.प्र.चौ.मि.

| भूखंड क्रमांक | एकूण भूखंड | प्रत्येक भुखंडाचे क्षेत्रफळ चौ.मि. | एकुण भूखंडाचे क्षेत्रफळ चौ.मि. | प्रत्येक भूखंडाची वार्षिक अकृषक आकारणी रुपये | अकृषीक आकारणी दर प्रति चौ.मि. प्रमाणे (रु.०.१० पै) चौ.मि. वार्षीक अकृषक आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ५३८५०.५५०. | ५३८५०.५५०. | ५३८५/- | ५३८५/- |
| २ | १ | २६८५.३२ | २,६८५.३२ | २६८/- | २६८/- |
| ३ | १ | ५८३७.९१६. | ५८३७.९१६. | ५८४/- | ५८४/- |
| एकूण | ३ | ६२३७३.७८६. | ६२३७३.७८६. | ६२३७/- | ६२३७/- |

१) निवासोपयोगी क्षेत्र ६२३७३.७८६ चौ.मिटर
२) वार्षिक अकृषीक आकारणी रुपये ६२३७/- ( अक्षरी रुपये सहा हजार दोनशे सदतीस फक्त )
३) Public Amenity प्लॉट नं. ४ क्षेत्र ७९७५.२१२ चौ.मिटर

अपर जिल्हाधिकारी यवतमाळ

Scanned by CamScanner

# अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय

रा.मा.क्र. २३ /एन.ए.पी-३४/२०११-२०१२
मौजा- यवतमाळ ग्रामीण ता.यवतमाळ

आवेदक :- धारीवाल अँड छोरीया डेव्हलपर्स एल.एल.पी. तर्फे भागीदार शांतीलाल देविचंद जैन, रा.पुणे

## आदेश

**( पारीत दिनांक ०८ /०६ /२०१२ )**

मौजा यवतमाळ ग्रामीण ता.यवतमाळ येथील गट नं. ३०/१, ३०/२, ३०/३, ३०/४/२ एकुण क्षेत्र ७.८९ हे.आर जमीन निवासी प्रयोजनाकरीता अकृषीक करण्याची परवानगी मिळणेबाबत आवेदक, श्री.विजयकुमार राधेश्याम अग्रवाल रा.यवतमाळ यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम. १९६६ चे कलम ४४ (१) नुसार या कार्यालयास दिनांक १.११.२०११ रोजी विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केला असून सदर प्रकरणात आवेदक यांनी सदर जमीन निवासी प्रयोजनासाठी अकृषक परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रकरणात अकृषक परवानगी देण्यासंबंधी या कार्यालयाचे पत्र क्रमांक /अका/अकृषीक/कावि/२३९२/२०११ दिनांक २.११.२०११ अन्वये सर्व संबधित कार्यालयाचे अभिप्राय मागविण्यात आले, तसेच प्रकरणात दिनांक २.११.२०११ रोजी जाहीरनामा काढण्यात आला व त्यामध्ये वरील जमीनी बाबत हितसंबध असणा-या ज्या व्यक्तींना आक्षेप व हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी एक महीन्याचे आंत किंवा तत्पूर्वी त्यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे असे सुचित करण्यात आले होते. व या तारखेनंतर आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले होते. प्रकरणात मुदतीत कोणचाही आक्षेप प्राप्त झाला नाही.

प्रकरणात कार्यवाही सुरु असतांना सदर शेतजमीन धारीवाल अँड छोरीया डेव्हलपर्स एल.एल.पी. तर्फे भागीदार शांतीलाल देविचंद जैन, रा.पुणे यांनी दि.१५.२.२०१२ रोजी खरेदी केल्यावरुन त्यांचे नांवाने अकृषक परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. सोबत ७/१२, फेरफार प्रकरणात सादर केला आहे.

(१) आवेदक हे जमीनीचे वहीवाटदार /मालक आहेत.

(२) सदर जमीन भूसंपादनाखाली नाही किंवा भविष्यात सार्वजनिक उपभोगाकरीता शासनास आवश्यक वाटत नाही.

(३) सदर जमीन विकास आराखडयात विशीष्ट प्रयोजनाकरीता राखीव नाही.

ज्याअर्थी उक्त प्रकरणात संबंधित विभागांनी खालील प्रमाणे अभिप्राय प्रकरणात सादर केलेले आहे.

सहाय्यक संचालक, नगर रचना,यवतमाळ यांनी त्यांचे पत्र जा.क्र /रुपांतरण/मौ.यवतमाळ/ स.क्र.३०/ ससंय/७७६ दिनांक- १८.५.२०१२ नुसार मौजा यवतमाळ ग्रामीण ता.यवतमाळ येथील गट नं. ३०/१, ३०/२, ३०/३, ३०/४/२ एकुण क्षेत्र ७.८९ हे.आर जमिनीचे प्रस्तावित अभिन्यासाला खालील अटी व शर्तीवर मंजूरी देण्याची आणि अभिन्यासाखालील जागेचा वापर निवासी प्रयोजनासाठी अंतीम मंजूरीची शिफारस केली आहे.

१) अभिन्यासातील खुली जागा,रस्ते व सार्वजनिक सुविधेसाठी प्रस्तावित भूखंडाव्यतिरिक्त ईतर भूखंडाचा उपयोग रहीवास वापराकरिताच करण्यात यावा.

२) भविष्य काळात अभिन्यासातील भूखंडाचे पूर्वपरवानगी शिवाय विभाजन करु नये.

३) अभिन्यासातील खुली जागा व सर्व रस्ते "अ " वर्ग नगर परिषदेस लागू असलेल्या बांधकाम नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.१४.३ नुसार आवेदकाने स्वखर्चाने विकसीत करुन रु. १/- इतक्या नाममात्र किंमतीवर स्थानिक प्राधिकरणाकडे व्यवस्थापनाकरीता हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

४) अभिन्यासातील भूखंडकात बांधकाम करतांना "अ" वर्ग नगर परिषदांना लागू असलेल्या बांधकाम विषयक नियमांचे पालन करावे.

५) इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करावे व स्थानिक प्राधिका-यांच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम करु नये.

६) सदर जागेतील वृक्षाचे सरंक्षण करुन प्रत्येक भूखंडधारकाने वृक्षाचे संवर्धन करावे.

७) अभिन्यासातील रस्ते, नाल्या इत्यादी बांधकाम करुन देखरेखीसाठी स्थानिक प्राधिकरणाकडे विनामुल्य हस्तांतरीत करावे.

८) महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू रुल्स, १९६९ (जमिनीच्या वापरातील बदल व अकृषक कर आकारणी) च्या कलम-४ च्या अटीचे पालन करावे.

९) विषयांकित जागेच्या अभिन्यासाला स्थानिक प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात यावी.

१०) अभिन्यासाच्या हद्दी व क्षेत्रफळ हे भूमि अभिलेख खात्याने प्रमाणित केलेल्या सिमांकीत मोजणी नकाशानुसार आहे. यामध्ये हद्दी व क्षेत्रफळाबाबत तफावत अथवा काही वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रद्द समजण्यात येईल.

-- २ --

Scanned by CamScanner

११) अभिन्यासामधिल भुखंड क्र.४ हा सार्वजनिक प्रयोजनार्थ प्रस्तावित केलेला आहेत. सदर भूखंडावरील नेमका सार्वजनिक वापर हा मा.जिल्हाधिकारी यवतमाळ, सहाय्यक संचालक, नगर रचना, यवतमाळ व स्थानिक प्राधिकरण यांचे संयुक्त परवानगीने करुन घेणे आवेदकावर बंधनकारक राहील, त्याशिवाय भूखंडावरील वापर व त्यासंबंधातील बांधकाम करता येणार नाही.

कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.)विभाग, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि.२१.३.२०१२ अन्वये खालील अटीचे अधिन राहून निवासी प्रयोजनाकरीता अकृषीक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

१) प्राप्त झालेल्या नकाशात दर्शविण्यात आलेला अभिन्यास धामणगांव रस्ता ते वणी रस्ता वळण रस्ता भाग ६ किमी. २२/२०० मध्ये रस्त्याचे डाव्या बाजुस वळण रस्त्या लगत असुन अनागरी भागात येत असल्यामूळ शासन परिपत्रकानुसार इमारत रेषा ही रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजुस ४० मि.चे अंतरावर राहील. तथापी सा.बां.खात्याची नियंत्रण रेषा ही रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजुस ७५ मि. अंतरावर राहील.

२) रस्त्यावर सांडपाणी न येण्याचे दृष्टीने मो-या व पुल बांधकामाचे नकाशे या कार्यालयास सादर करुन त्यावर बांधकामाकरीता या खात्याची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३) मुख्य रस्त्यास समांतर १२.०० मिटर रुंदीचा सेवा मार्ग आवश्यक असुन या रस्त्यास मुख्य रस्त्यावरुन एकाच ठिकाणी पोचमार्ग देता येईल.

४) पोचमार्गाची रस्ता पातळी मुख्य राज्य मार्गाच्या ३०.०० से.मि.कमी असावी.

५) भविष्यात रस्ता रुंदीकरणाकरीता जागा आवश्यक असल्यास सदर बांधकाम मालकास स्वखर्चाने पाडून टाकावे लागेल. व जागा अधिग्रहन करण्याचे अधिकार या विभागास राहतील.

६) सदर प्रस्तावित अभिन्यासात कुठल्याही शासकीय योजनेत भू-अर्जन करण्याचे प्रस्तावित असल्यास त्याची पडताळणी करण्याची जाबाबदारी आपले विभागाची राहील.

७) सदर अभिन्यासास एकच पोचमार्ग घेता येईल. पोचमार्ग व त्यावरील मोरीच्या बांधकामाला सा.बां.खात्याची रितसर परवानगी घेतल्याचे आढळुन आले नाही तर सदर अभिन्यासाची परवानगी आपोआप रद्द होईल.

८) सदर नाहरकत प्रमाणपत्र नमुद केलेल्या निवासी कामाकरीताच लागु राहील व इतर बांधकामा करीता लागु राहणार नाही

९) नमूद केलेला अभिन्यासाचा प्रकार जसे (निवासी बांधकाम) बदलल्यास ही मंजुरी रद्द समजण्यात यावी.

१०) सांडपाणी व परिसरातील पाणी रस्त्याचे हद्दीत येणार नाही व त्यामुळे जेणे करुन रस्त्याचा पृष्ठभाग तसेच रस्त्याची बाजु खराब होणार नाही व त्यामुळे अपघात होणार नाही याची जबाबदारी आवेदकाने घ्यावी.

११) या भागातील कोणत्याही प्रकारची झाडे तोडली जाणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्रस्तावित जागेत वृक्षारोपन करणे बंधनकारक राहील.

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि.२.४.२०१२ अन्वये पाणी पुरवठा करण्याची जवाबदारी प्राधिकरणाची राहणार नाही. असे कळविले आहे.

कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दिनांक २८.११.२०११ अन्वये सदर क्षेत्र हे हया विभागाचे अधिनस्त असलेल्या प्रकल्पाचे संबंधित नसल्याचे कळविले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ, यांनी त्यांचे पत्र दिनांक १०.४.२०१२ अन्वये सदर जमीन निवासी वापराकरीता योग्य असल्याचे कळविले आहे.

मुख्याधिकारी, नगर परिषद, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि.२४.२.२०१२ अन्वये सदर जमिन नगर परिषद हद्दीचे बाहेर असुन नगर परिषदेचे कार्यक्षेत्र नसल्याचे कळविले आहे.

सचिव, यवतमाळ ग्रामीण क्षेत्र, यांनी त्यांचे पत्र दिनांक २२.३.२०१२ अन्वये ठराव क्र.२ दि.२२.३.२०१२ नुसार ठरावाचे प्रतीसह अभिप्राय सादर करुन रस्ते, नाल्या, पिण्याच्या पाण्याची सोय, विजेची सोय इ. मुलभूत सुविधा करण्याचे अटीवर अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

भारस्थ अधिकारी, भूसंपादन विभाग, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि.२९.२.२०१२ अन्वये सदर जमीन संपादनाचा प्रस्ताव शोध घेतला असता प्रलंबित किंवा सुरु नसल्याचे कळविले आहे.

कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि.१६.५.२०१२ अन्वये भविष्यातील तरतुद म्हणून रोहीत्रासाठी नियमानुसार जागा राखुन ठेवण्याचे अटीवर अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, यवतमाळ, यांनी त्यांचे पत्र दि.१३.४.२०१२ अन्वये सदर ले-आऊटच्या मध्ये ३ विंधन विहीर ६० मी. खोली आणि १५० मीमी व्यासाची तसेच एक साधी विहीर ले-आऊटच्या दक्षिण- पुर्ण भाग १५ मी. खोली आणि ६ मी. व्यासाची घेण्याचे शिफारसीवर अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

कार्यकारी अभियंता, ई.एच.व्ही.टी.,अमरावती, यांनी त्यांचे पत्र दि.१५.३.२०१२ अन्वये सदर जमिन अकृषक करण्यास नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

-- ३ --

Scanned by CamScanner

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, अमरावती, यांचे पत्र दि.२७.२.२०१२ अन्वये सदर जमीन सद्यस्थितीत महामंडळाचे भूसंपादनाखाली नसल्याचे कळविले आहे.

तलाठी यवतमाळ यांनी दि.११.५.२०१२ अन्वये विहीत नमुन्यात स्थळ निरिक्षण अहवाल सादर करुन अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

वरील सर्व मुद्दे विचारात घेता आवेदकांनी निवासी प्रयोजनाकरीता मागीतलेली परवानगी देण्यास हरकत नसावी. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ (१) व शासनाचे व महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्रमांक-एन.ए.पी.-१०८८/प्रक्र १२७५/सी.आर-१९/ल-२/ दिनांक १२.१०.१९८८ नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये, मी अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ आवेदक धारीवाल अँड छोरीया डेव्हलपर्स एल.एल.पी. तर्फे भागीदार शांतीलाल देविचंद जैन, रा.पुणे यांना मौजा यवतमाळ ग्रामीण ता.यवतमाळ येथील गट नं. ३०/१, ३०/२, ३०/३, ३०/४/२ एकूण क्षेत्र ७.८९ हे.आर जमीन निवासी प्रयोजनाकरीता खालील अटी व शर्तीवर अकृषक परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

१) मंजूर करण्यात आलेली अकृषीक परवानगी महा. जमीन मह.अधिनियम १९६६ व त्या नियमांचे तरतुदीला धरुन असेल.

२)आवेदकास अकृषीक परवानगी ज्या प्रयोजनाखाली मंजूर करण्यात आली त्याच प्रयोजनाकरीता जागेचा वापर करावा.जागेचा किंवा इमारतीचा काही भाग दुस-या प्रयोजनाकरीता उपयोग घ्यावयाचा असल्यास सक्षम अधिका-याची परवानगी घेऊनच वापर करावा.

३) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या भूखंडाचे विभाजन करता येणार नाही. परंतु सदर अटीचा भंग केला असे आढळून आल्यास आवेदकावर दंडात्मक कार्यवाही म्हणून अकृषक आकारणी एवढा दंड भरुन भूखंडाचे विभाजन करता येईल. भूखंडाचे विभाजन करुन विक्री करुन देण्यापूर्वी भूखंड विभाजनाची परवानगी घेवूनच भूखंडाची विक्री करण्यात यावी त्याशिवाय भूखंड विभाजनाची मंजूरी देण्यात येणार नाही.

४) अभिन्यासातील संपूर्ण भूखंडाचा वापर (सार्वजनिक प्रयोजनकरीता खुली जागा व्यतीरीक्त) निवासी प्रयोजनाकरीताच करावा. स्थानिक प्राधिकरणाच्या विकास योजनेप्रमाणे निवासी भूखंडाचे वापरास परवानगी असेल.

५) अभिन्यासातील एकूण **क्षेत्रफळाच्या ७९१०.४९७** चौ.मि.आरक्षीत म्हणून मोकळी / खुली ठेवतील, व सदर जागा स्थानिक प्राधिकरणास पुढील व्यवस्थे करीता हस्तांतरीत करतील.

६) अभिन्यासातील भूखंड प्रत्यक्ष जागेवर मोजणी /सिमांकन करुन १५०.०० चौ.मी.पेक्षा कमी नसेल व अभिन्यासातील रस्त्याजवळ व लागुन असलेले सर्व्हे नं.समांतर व योग्य रितीने जोडतील.

७) आवेदकाने लेआऊट विकसीत करावा विकसीत केल्याचे या कार्यालयास कळवावे.

८) अभिन्यासातील रस्ते/मो-या व नाल्याचे बांधकाम आवेदक करतील. सदर सुवीधा करुन घेण्याची जबाबदारी **स्थानिक प्राधिकरणाची** राहील व सुविधा असल्याबाबतची खात्री करुन घेण्याची जबाबदारी ही भूखंड खरेदी करणा-याची राहील.

९) आवेदकास अभिन्यासातील भूखंडाचा व्यवहार कोणत्याही प्रकारच्या काल्पनिक अथवा सट्टाबाजीसाठी करता येणार नाही.

१०) आवेदक हे अभिन्यासातील जागेवर १००.०० चौ.मी.करीता कमीत कमी एक झाड याप्रमाणे मंजूरी आदेशाप्रमाणे एक वर्षाच्या आंत झाडाची लागवड करुन निमा राखतील. जर सदर अटीचा भंग केल्या दरवर्षी अकृषीक आकारणी एवढी रक्कम दंड म्हणून भरणा करावी लागेल.

११) आवेदक, सहा.संचालक नगर रचना, यवतमाळ, व इतर विभाग यांनी घालून दिलेल्या सर्व शर्ती व अटीचे पालन करणे आवेदकावर बंधनकारक राहील.

१२) अभिन्यासातील आरोग्याचे दृष्टीने योग्य अशा नाल्या व मो-या बांधून देण्याची जबाबदारी **स्थानिक प्राधिकरणाची** राहील. व सुविधा असल्याबाबतची खात्री करुन घेण्याची जबाबदारी भूखंड खरेदी करणा-याची राहील.

१३) अभिन्यासातील भूखंड व त्यावरील इमारत जर आवेदकाने विकला किंवा परस्पर निकालात काढला तर या आदेशाची नोंद खरेदी खतात घेणे बंधनकारक राहील.

१४) मंजूर अभिन्यासातील भूखंडावर इमारतीचे बांधकाम स्थानिक प्राधिकरणाचे मंजूरी शिवाय करण्यात येवू नये.उर्वरीत मोकळया जागेवर कोणतेही बांधकाम करु नये .व ते मोकळे किंवा खुले ठेवावे लागतील.

१५) आवेदक मंजूर आदेशापासून एक वर्षाचे आंत अभिन्यासातील अकृषीक वापर सुरु करतील किंवा सक्षम अधिका-यांकडून मुदत वाढवून घेतील. मुदत वाढ न घेता जागेचा अकृषीक वापर सुरु केला असेल तर मंजूरी आदेश आपोआप रद्द होईल व त्याबाबतची जबाबदारी आवेदकावर राहील.

१६) आवेदकास मंजूर अभिन्यासातील भूखंडावर प्रस्तावित इमारत किंवा दुसरे बांधकाम करण्यापूर्वी स्थानिक प्राधिकरणाची व नगर रचना विभागाची परवानगी घ्यावी लागेल. मंजूर बिल्डींग प्लॅन प्रमाणेच बांधकाम करावे लागेल.

१७) आवेदक, अकृषीक वापर सुरु केल्याचा दिनांक तहसिलदार, **यवतमाळ** यांना देवून तलाठी, **यवतमाळ** मार्फत कळवतील. अकृषीक वापर सुरु झाल्यापासून एक महिण्याच्या आंत असे न कळविल्यास महाराष्ट्र जमीन महसूल, (जमीनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी ) नियम,१९६९ चे कलम ६ प्रमाणे कारवाईस पात्र राहतील.

१८) आवेदकास ज्या प्रयोजनाकरीता जागेचा वापर सुरु केला असेल त्या दिनांका पासून मंजूर दराप्रमाणे निवासी प्रयोजनाकरीता रुपये ०.१० चौ.मी. प्रमाणे आकारणीचा भरणा करावा लागेल.

-- ४ --

Scanned by CamScanner

**--परिशिष्ट --**

| अ. क्र. | तपशिल | क्षेत्रफळ चो.मि | अकृषीक आकारणी निवासी प्रयोजना साठी प्रति चो.मी. रु.०.१० पै. |
|---|---|---|---|
| १ | निवासी भूखंडाखालील क्षेत्रफळ | ६२३७३.७८६ | ६२३७/- |
| २ | ओपन स्पेस खालील क्षेत्रफळ | ७९१०.४९७ | |
| ३ | रस्त्या खालील क्षेत्र | ६४०.५०५ | |
| ४ | Public Amenity प्लॉट नं. ४ चे क्षेत्र | ७९७५.२१२ | |
| | एकुण- | ७८९००.०० | ६२३७/- |

१९) वार्षीक अकृषीक आकारणी रुपये १२०३/- दिनांक १.८.२०११ ते ३१.७.२०१२ या कालावधीसाठी राहील.

२०) सदर अभिन्यास हा **अ वर्ग** नगर परिषदेच्या परिघातील हद्दीत येत असल्यामुळे कलम ४७ अ नुसार परावर्तीत कर (६२३७ x ५ ) = ३११८५/ अकारण्यात येत आहे.

२१) दर पांच वर्षांनी पुनर्विलोकन होईल त्यावेळी शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दरानूसार सुधारीत रक्कम व फरकाची रक्कम भरणा करणे, आवेदकास बंधनकारक राहील.

२२) आवेदकाने शासनाच्या सुधारीत आदेशाप्रमाणे मोजणी फी (भूखंड निहाय) चा भरणा केला आहे व उप अधिक्षक भूमी अभिलेख, यांनी अभिन्यासा प्रमाणे भूखंडाची मोजणी करुन दिलेली आहे.

२३) भूखंडाधारकाने मंजूर प्लॅनप्रमाणे बांधकाम केले असल्यास त्यात पुन्हा सुधारणा वा बदल करावयाचा असल्यास सक्षम अधिका-याचे पूर्व परवानगी शिवाय बांधकाम करता येणार नाही.

२४) आवेदक, वरील नियमावलीतील परिशिष्टाप्रमाणे सनद तयार करुन देतील व एक महीन्याचे आंत अकृषीक वापर सुरु करतील.

२५) आवेदकांनी आदेशातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास दिलेली परवानगी रद्द केली जाईल, किंवा अकृषीक आकारणी एवढा दंड भरणा करावा लागेल.

२६) अकृषीक आकारणी बाबत **परिशिष्ट एक** सोबत जोडले आहे.

२७) वरील पैकी कोणत्याही अटी किंवा शर्तीचा भंग झाला असे आढळुन आल्यास अनधिकृत बांधकाम समजण्यात येवून विहीत मुदतीत बांधकाम काढले जाईल व त्यावर आलेला खर्च आवेदकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल केला जाईल.

२८) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली अकृषीक परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी) नियम १९६९ च्या तरतुदी खाली देण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी उपरोक्त सर्व नंबरची मंजूर अभिन्यासानुसार तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांचेकडून मोजणी करुन उपरोक्त प्रमाणे अभिन्यासाला अंतीम मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे आणि ज्याअर्थी महसुल व वन विभागा परिपत्रक क्रमांक- आरएएम- १०९०/(२१०४)/ल-६ दिनांक-२७.१२.९० तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख(म.रा.) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक-एलआर-२२७/सीआर-३०४९/भू-३/२००१ दिनांक- २० जानेवारी २००१ नुसार ज्या जमिनींना अकृषीक परवानगी देण्यात येते, त्या जमिनीचे बाबत सिटी सर्व्हे ऑफीस कडून भूखंड निहाय मिळकत पत्रीका (Proparty Card) तयार करणे आवश्यक आहे. त्याअर्थी सिटी सर्व्हे ऑफीसर यांनी उपरोक्त अंतीमरित्या मंजूर अभिन्यासाचे भुखंड निहाय मिळकत पत्रिका तयार करुन त्याची प्रत्येकी एक प्रत प्रकरणात अभिलेखा करिता पाठवावी, तसेच उक्त अंतिमरित्या मंजूर अभिन्यासाची नोंद तलाठी यांनी गाव नमुना दोन मध्ये घेवून त्याची प्रत अभिलेखाकरिता पाठवावी, त्याचप्रमाणे भुखंड निहाय ७/१२ बनविण्यात यावे. तालुका निरीक्षक,भूमि अभिलेख यांनी उक्त सर्व्हे नंबरचे कमी जास्त पत्रक तात्काळ तयार करुन अभिलेखा करीता या कार्यालयाकडे तसेच संबंधीत तलाठी यांचंकडे पाठविण्यात यावे आणि संबंधीत तलाठी यांनी प्राप्त कमी जास्त पत्रकानुसार संबंधीत गाव नमुन्यामध्ये नोंद घेऊन या कार्यालयास कळवावे, असे आदेशित करण्यात येत आहे.

( आय.एम.तिटकारे )

अपर जिल्हाधिकारी यवतमाळ

Scanned by CamScanner